# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.क्रिडा समिती
## कार्यपत्रिका क्रमांक :- ९
## सभावृत्तांत

दिनांक :- २०/१/२०१० वेळ :- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक २०/१/२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.खेडकर घनशाम रामचंद्र - सभापती
२) मा.सुमनताई मधुकर पवळे
३) मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबु नायर
४) मा.जाधव विजया अशोक (मामी)

याशिवाय मा.कारचे - सहा.आयुक्त,मा.भंडारे - प्र.उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले -

विषय क्रमांक :- ४) कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरुनगर येथील बॉक्सिंग प्रशिक्षण केंद्र सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेबाबत..मा.प्रेमकुमार नायर,मा.सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ५) मानधनावर जीवरक्षक उपलब्ध करुन देणेबाबत.. मा.प्रेमकुमार नायर, मा.सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ६) व्यायामसाहित्य खरेदी करणेबाबत.. मा.प्रेमकुमार नायर, मा.सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव..

दि.१६/१२/०९ व ६/१/१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ८) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक :- १९ विषय क्रमांक :- १
दिनांक :- २०/१/२०१० विभाग - क्रिडा
सुचक :- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक :-मा.सुमनताई पवळे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/ग्रं/कावि/६४०/०९दि.१८/११/०९
विषय :- मनपा जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, देखभाल व यांत्रिक दुरुस्ती कामाचे दुस-या वर्षाचे दरांस मान्यता देणेबाबत..

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २० विषय क्रमांक :- २
दिनांक :- २०/१/२०१० विभाग - क्रिडा
सुचक :- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक :-मा.विजया जाधव
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/४/कावि/२३/१०दि.६/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे ..

प्रस्तावात नमुद प्रमाणे मनपाच्या १३ व्यायामशाळा या सार्वजनिक संस्थांना सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास दिल्याचा करार, रकाना क्र.४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे संपुष्टात येत असल्याने रकाना क्र.५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मुदतवाढ व रकाना क्र.६ मध्ये नमुद केल्या प्रमाणे सेवाशुल्क देउन मनपा व्यायामशाळा कराराने चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २१ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- २०/१/२०१० विभाग - क्रिडा
सुचक :- मा.सुमनताई पवळे अनुमोदक :-मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/७/कावि/२०/१०दि.८/१/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे ..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आंतर शालेय विद्यार्थ्यांच्या ८ कला व गिर्यारोहण स्पर्धा आयोजनाकामी, विद्यार्थ्यांना द्यावयाचा खाउ (केळी/बिस्कीटे) खरेदी, कला व गिर्यारोहण पुस्तिका व चित्रकला स्पर्धेसाठी आवश्यक चित्रकला कागद ही कोटेशन नोटिस प्रसिध्द करुन, फ्लेक्स बॅनर, ट्रॉफीज, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्र छपाई इ.खरेदी क्रीडा विभागाचे मंजूर निविदा दरांनुसार खरेदी करणे, प्रेक्षागृह भाडे, पी.एम.पी.एम.एल. बस भाडे इ.कामी येणा-या अंदाजे एकुण र.रु. २,७०,६६४/- खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास व सदर खर्च क्रीडा निधी मधील वार्षिक क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-

ठराव क्रमांक :- २२ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- २०/१/२०१०
सुचक :- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक :-मा.सुमनताई पवळे
संदर्भ :-मा.प्रेमकुमार नायर,मा.सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरुनगर येथील बॉक्सिग प्रशिक्षण केंद्र चालविले जाते. सदर बॉक्सिग प्रशिक्षण केंद्र हे च्देवांग बॉक्सिग ॲण्ड सोशल ॲकॅडमी, पिंपरी ४११ ०१८छ ही संस्था सेवाशुल्क तत्वावर १० वर्षे कराराने चालविणेस घेणेस तयार आहे. सदर संस्था, कॅप्टन गोपाल देवांग हे आंतरराष्ट्रीय खेळाडु चालवित असून गोपाल देवांग हे अर्जुन पुरस्कार विजेते आहेत. त्यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बॉक्सिग स्पर्धेत प्राविण्य मिळविले आहे. कॅप्टन गोपाल देवांग हे सध्या मनपाच्या क्रीडा विभागात बॉक्सिग मार्गदर्शक म्हणून मानधनावर कामकाज करित आहेत. त्यांना मनपाचे बॉक्सिग प्रशिक्षण केंद्र कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास दिल्यास मनपा परिसरातील बॉक्सिग खेळाडुंना मार्गदर्शन मिळून, शहरात अनेक बॉक्सिग खेळाडु तयार होण्यास मदत होईल. तरी मनपाच्या वतीने कै.अण्णासाहेब मगर स्टेडियम, नेहरुनगर, पिंपरी १८ येथे नव्याने सुरु करण्यात आलेले, बॉक्सिग प्रशिक्षण केंद्र हे देवांग बॉक्सिग ॲण्ड सोशल ॲकॅडमी, पिंपरी ४११ ०१८ या संस्थेस दरमहा सेवाशुल्क र.रु. २०,०००/- देवून १० वर्षे कराराने चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २३ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- २०/१/२०१०
सुचक :- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक :-मा.सुमनताई पवळे
संदर्भ :-मा.प्रेमकुमार नायर,मा.सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने एकुण ७ जलतरण तलाव चालविले जातात. मनपाकडुन प्रत्येक तलावावर १ लिपीक, ४ जिवरक्षक व २ सुरक्षारक्षकांची नेमणुक केलेली आहे. उन्हाळी सिझनमध्ये मनपा जलतरण तलावांवर मोठया प्रमाणात पोहणा-या नागरिकांची गर्दि होत असते. पोहणा-या नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उन्हाळी सिझन (माहे मार्च ते जून) या काळामध्ये ठेकेदारांकडुन जीवरक्षक उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. गतवर्षी जॉय स्पोर्टस क्लब, पिंपळे गुरव यांनी दरमहा प्रती जीवरक्षक रक्कम रुपये ४०००/- या दराने १४ जीवरक्षक पुरविले होते. त्यांनी पुरविलेले जिवरक्षक लाईफ सेव्हींग्ज प्रमाणपत्र प्राप्त होते. त्यामुळे मनपा चे ७ जलतरण तलावासाठी माहे मार्च ते जून २०१० या उन्हाळी सिझनकरिता जॉय स्पोर्टस क्लब, पिंपळे गुरव यांकडुन दरमहा प्रति जिवरक्षक र.रु. ४०००/- या दराने एकुण ३० जिवरक्षक उपलब्ध करुन घेणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी

मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २४ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- २०/१/२०१०
सुचक :- मा.प्रेमकुमार नायर अनुमोदक :-मा.सुमनताई पवळे
संदर्भ :-मा.प्रेमकुमार नायर,मा.सुमनताई पवळे यांचा प्रस्ताव..

पिं.चिं.मनपा च्या वतीने एकुण ७२ व्यायामशाळा चालविल्या जातात. सदर व्यायामशाळांकरिता नव्याने व्यायाम साहित्य मिळणेबाबत सन्मा.नगरसदस्यांनी मागणी केलेली आहे. मनपाच्या व्यायामशाळांकरिता एकसारखे व चांगल्या दर्जाचे व्यायामसाहित्य पुरविणे आवश्यक आहे. याकामी प्रस्तावासोबत जोडलेल्या स्पेसिफीकेशन प्रमाणे व्यायामसाहित्य खरेदी करण्याची कार्यवाही करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

[खेडकर घनशाम रामचंद्र]
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/९/कावि/१२०/२०१०
दिनांक :- २२/१/२०१० सही/-
प्र.उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८

प्रत :- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.